# लालबहादूर शास्त्री

(दि.२ ऑक्टोबर, १९०४ - ११ जानेवारी, १९६६)

(अल्प परिचय)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील निष्ठावान कार्यकर्ते, थोर राष्ट्रभक्त आणि भारताचे दुसरे पंतप्रधान (दि.९ जून, १९६४-११ जानेवारी, १९६६). त्यांचे आडनाव श्रीवास्तव, पण त्यांनी या आडनावाचा व्यवहारात कधीही उपयोग केल्याचे आढळत नाही. शास्त्रीजींचा जन्म बनारसजवळील मोगलसराई या रेल्वे वसाहतीत शारदाप्रसाद व रामदुलरिदेवी या दांपत्याच्या पोटी झाला.

हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये ते मॅट्रिकला असताना महात्मा गांधीजींनी असहकाराची चळवळ (१९२१) सुरू केली होती. शास्त्रीजींनी शाळा सोडली व महात्मा गांधीजींच्या विचारसरणीकडे ते आकृष्ट झाले. पुढे त्यांना महात्मा गांधीजींचा सहवास लाभला व ते पूर्णतः गांधीवादी बनले. त्यांनी काशी विद्यापीठातून तत्त्वज्ञान या विषयात पहिल्या वर्गात शास्त्री ही पदवी मिळविली (१९२५).

स्वातंत्र्य चळवळीत त्यांना अनेक वेळा अटक होऊन कारावास भोगावा लागला. सन १९४२ च्या चळवळीत भूमिगत राहून त्यांनी कार्य केले; पण पुढे त्यांना अटक झाली. तुरुंगात त्यांनी मादाम क्यूरीच्या चरित्राचे हिंदीत भाषांतर केले. केरळमध्ये घडलेल्या भीषण रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून त्यांनी रेल्वे मंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि आदर्श घालून दिला (१९५६).

पंडित नेहरूंच्या निधनानंतर (दि.२७ मे, १९६४) कॉंग्रेसच्या संसदीय सभेने दि. ९ जून, १९६४ रोजी शास्त्रीजींची पंतप्रधान म्हणून एकमताने निवड केली.

शास्त्रीजींनी भारताचे शांतता आणि अलिप्तता या तत्त्वांवर आधारित परराष्ट्रधोरण पुढे चालू ठेवले. श्रीलंका, भूतान, नेपाळ यांसारख्या शेजारी देशांमध्ये विश्वास निर्माण करून त्यांच्याशी असलेली मैत्री दृढ करण्यावर भर दिला. भारत श्रीलंका यांत करार करून भारतीय तमिळांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळवून दिले.

दि. १४ ऑगस्ट, १९६५ रोजी पाकिस्तानने युद्धबंदीरेषा ओलांडून अतिक्रमण केले. तेव्हा भारतानेही युद्धबंदीरेषा ओलांडून लाहोरच्या परिसरात भारतीय फौजा घुसवल्या (दि.६ सप्टेंबर, १९६५). पाक आक्रमणाला प्रतिआक्रमणाने उत्तर देऊन त्यांनी भारताच्या इतिहासात प्रथमच आक्रमक शत्रूच्या प्रदेशांत घुसून लढाई करण्याचा मान मिळविला. संयुक्त राष्ट्र संघटनेने युद्धविरामाची विनंती करताच एकतर्फी युद्ध थांबवून वाटाघाटीस तयारी दर्शविली.

भारत-पाक यांत रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंदला वाटाघाटी होऊन नऊ कलमी *ताश्कंद करारा*वर जनरल आयुबखान व शास्त्रीजी यांच्यात दि. १० जानेवारी १९६६ रोजी सह्या झाल्या. त्या मध्यरात्रीच शास्त्रींचे हृदयविकाराने निधन झाले.

त्यांचा मूळ पिंड शांततावादी समाजसेवकाचा होता. संघटनकौशल्य हा त्यांचा स्थायी भाव होता. साधी राहणी, उच्च विचारसरणी, सत्‌शील व निरिच्छ वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणा यांमुळे अनेकांचा त्यांनी विश्वास संपादिला. भारत-पाक युद्धाच्या वेळी त्यांच्या राष्ट्रीय अस्मितेचे आणि कणखर धोरणाचे दर्शन जगाला घडले. त्यांची “जय जवान, जय किसान” ही अर्थपूर्ण घोषणा पुढे अजरामर झाली. भारत सरकारने “भारतरत्न” हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा मरणोत्तर सन्मान केला.

******

( स्रोत - सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळ)